# श्री.सिध्देश्वर महाविद्यालय,माजलगाव

## क्रिडा विभाग

## (अहवाल २०१७-२०१८ )

## वरिष्ठ विभाग

१) क्रिडा विभगाच्या वतीने नियमित उपक्रमाअंतर्गत १४ ऑगस्ट(अखंड भारत दिन), १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन(ध्वजारोहन),२९ ऑगस्ट(राष्ट्रीय खेळ दिवस)मेजर ध्यानचंद प्रतिमा पुजन,१७ सप्टेंबर (मराठवाडा मुक्ती संग्राम दिन) ध्वजारोहन या कार्यक्रमाचे उत्साहामध्ये आयोजन करण्यात आले होते.

२) क्रिडा विभागाच्या वतीने दि.१६ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर विश्वविजेत्या भारताच्या लेकी या महिला किकेट संघाने उपविजेत्या कामगिरी वरील भित्तीपत्रकाचे विमोचन केले होते.

३) महाविद्यालयाच्या क्रिडा विभागाने यावेळी अंतर महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धेत (१)क्रॉस कंन्ट्री-३ (२)जलतरण स्पर्धा -४,(३)बुध्दीबळ स्पर्धा -४(४)अॅथेलेटीक्स स्पर्धा- ८(५)कुस्ती स्पर्धा-१ अशा ५ खेळात आपले संघ स्पर्धेत उतरवले होते या करीता एकूण २० स्पर्धकांनी या मध्ये सहभाग नोंदवला होता.

४) या स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाच्या मैदानावर विद्यार्थी खेळाडूंचा नियमित सराव चालू होता. व त्यांना वेळोवेळी खेळातील कौशल्याविषयी माहिती देण्याचे काम व खेळातील सुधारण्याच्या सुचनाही देण्यात येत होत्या. तसेच क्रिडा विभाग त्यांना सर्व आवश्यक सुविधा ही उपलब्ध करुन देत होता.

५) सत्रांताच्या शेवटी माजी विद्यार्थींच्या पुढाकाराने महाविद्यालयाच्या क्रिडा विभागाने खुल्या हॉलीबॉल(शॉट/पास)स्पर्धेचे आयोजन दिनांक १६ ऑक्टोंबर २०१७ रोजी केले होते या स्पर्धेत विभाग स्तरावरील एकूण १६ संघ सहभागी झाले होते.त्या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री.प्रकाशजी दुगड,मा.रोहित देशमुख,प्रा.डॉ.महेश देशमुख सह अनेकांची उपस्थिती होती.

६) ६ जानेवारी २०१८ दर्पण दिन साजरा.

Scanned by CamScanner

## -: शैक्षणिक प्रगती अहवाल :-

७) International Journal मध्ये तीन शोध निबंध प्रसिध्दीस दिले.

८) १७ फेब्रुवारी २०१८ International Conference ला उपस्थिती.

९) पीएच.डी.चे कार्य पुर्णत्वाच्या टप्यात असून शोध प्रबंध चे कार्य पुर्ण होण्या पुर्वी संबंधीत संशोधनविषयाच्या अंतीम गोषवारा (Final Synopsis) पीएच.डी.विभागात दाखल केला आहे.

१०) २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी राष्ट्रध्वज मोठया उत्साहात ध्वजारोहन केल्यानंतर क्रिडा विभागाच्या वतीने खो-खो खेळाची नियमावली चा भितीपत्रकाचे अनावरण करण्यात आले.

११) महाविद्यालयात वार्षीक स्नेहसंम्मेलन प्रमुख म्हणुन जबाबदारी पुर्ण करताना स्नेहसंम्मेलन उत्साहात संपन्न झाले.

## -: क्रिडा विभाग व संस्था कार्य :-

१२) संस्थेने दिलेल्या जबाबदारी अंतर्गत संकुलाच्या माध्यमिक विभागाच्या मैदान निर्मीती करीता प्रस्ताव तयार करुन व पाठपुरावा करतांना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन क्रिडांगण विकासा अंतर्गत ३ लाख ५५ हजार रुपयोचे अनुदान मंजुर करुन घेतले व प्राप्त केले.

१३) महाविद्यालयाच्या क्रिडा विभागाने राज्यशासनाच्या क्रिडा साहित्य निर्मीती योजनेअंतर्गत प्रस्ताव टाकुन सतत पाठपुरावा करत व त्रटी पुर्तता करत प्रयत्न करुन ॲथेलेटीक्स खेळांच्या साहित्य खरेदी करीता राज्यशासनाकडून १० लाख रुपयांचे अनुदान मंजुर करुन घेतले असून त्याची मजुरी आदेश ही प्राप्त झाला आहे.खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

१४) नियोजीत भांडारगृह(क्रिडा विभाग) यास क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य,पुणे व्दारा क्रिडांगण विकास अनुदान योजनेअंतर्गत १० लाखाचे क्रिडा अनुदान तत्वत: मंजुरी मिळाली असून संस्था हिस्सा २.५ लाख रुपयातुन संबंधीत भांडारगृहाचे बांधकाम पुर्ण केले आहे.उर्वरीत बांधकाम व अंतर्गत काम शासन अनुदान मिळताच पुर्ण करण्यात येणार आहे.

## -: योगा विभाग :-

१५) क्रिडा विभागाअंतर्गत योगा विभागाने प्रतिवर्षी प्रमाणे २१ जुन रोजी जागतीक योग दिना निमित्त एक दिवसीय योग शिबीराचे आयोजन केले होते.सकाळीं ६.००ते ७.०० या वेळेत महाविद्यालयीन प्राध्यापक,कर्मचारी यांच्या ०करीता आयोजित करण्यात आाले होते.या योग शिबीराच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय कार्यकारणी सदस्य राधेश्यामजी लोहिया यांची तर मार्गदर्शक म्हणुन प्रसिध्द योग तज्ञ तथा दंतरोग तज्ञ डॉ.सत्येंद्रजी दबडगांवकर यांची उपस्थीती होती. प्रमुख

Scanned by CamScanner

पाहुणे म्हणुन अमरनाथजी खुर्पे(स्थानिक कार्यवाह),प्राचार्य डॉ.महेश देशमुख यांची उपस्थीती होती.

### -: शिस्तपालन विभाग :-

१६) महाविद्यालयातील शिस्तपालन समिती,स्वच्छता समितीची जबाबदारी पार पाडत असतांनाचा वेळोवेळी सदरील समितीचे नियोजन व बैठकांच्या माध्यमातुन सतत पाठपुरावा करण्याचे काम केले.शिस्त पालन समितीने या विभागाचे नियोजन करतांना सुरक्षा रक्षकाकडे महाविद्यालयामध्ये ओळखपत्राशिवाय येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची नोंद ठेवणे सुरु केले आहे.तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्व समितीचे सदस्य नियमितपणे ओळखपत्राची विचारणा करीत असतात.

१७) महाविद्यालयातील Students Grievance समितीच्या माध्यमातुन गैरवर्तनुक करणाऱ्या विद्यार्थ्यांना मा.प्राचार्य व समिती सदस्य यांच्या एकत्रित निर्णयातून संबंधीत विद्यार्थ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला जातो.

### -: स्वच्छता विभाग :-

१८) महाविद्यालयाच्या स्वच्छताभागामध्ये प्रा.उमेश साडेगावकर(प्रमुख), डॉ.रमेश गटकळ, डॉ.गजानन होन्ना,यांचा सहभाग असून महाविद्यालय परीसर व खोल्याची नियमित स्वच्छता करण्यात येते.

१९) स्वच्छता विभागाने या करीता स्वतंत्र्य नियोजन करत महाविद्यालयातील सेवकाकडे स्वच्छतेची जबाबदारी वाटप करतांना नियमित स्वच्छतेची नोंद हजेरीपटावर ठेवली आहे.

**प्रा.उमेश साडेगावकर**
(क्रिडा विभाग प्रमुख)

Scanned by CamScanner